
# मराठी
# सुगमभारती
## इयत्ता सहावी



# भारताचे संविधान

**भाग ४ क**

## नागरिकांची मूलभूत कर्तव्ये

**अनुच्छेद ५१ क**

**मूलभूत कर्तव्ये – प्रत्येक भारतीय नागरिकाचे हे कर्तव्य असेल की त्याने –**

(क) प्रत्येक नागरिकाने संविधानाचे पालन करावे. संविधानातील आदर्शांचा, राष्ट्रध्वज व राष्ट्रगीताचा आदर करावा.

(ख) स्वातंत्र्याच्या चळवळीला प्रेरणा देणाऱ्या आदर्शांचे पालन करावे.

(ग) देशाचे सार्वभौमत्व, एकता व अखंडत्व सुरक्षित ठेवण्यासाठी प्रयत्नशील असावे.

(घ) आपल्या देशाचे रक्षण करावे, देशाची सेवा करावी.

(ङ) सर्व प्रकारचे भेद विसरून एकोपा वाढवावा व बंधुत्वाची भावना जोपासावी. स्त्रियांच्या प्रतिष्ठेला कमीपणा आणतील अशा प्रथांचा त्याग करावा.

(च) आपल्या संमिश्र संस्कृतीच्या वारशाचे जतन करावे.

(छ) नैसर्गिक पर्यावरणाचे जतन करावे. सजीव प्राण्यांबद्दल दयाबुद्धी बाळगावी.


(ज) वैज्ञानिक दृष्टी, मानवतावाद आणि जिज्ञासूवृत्ती अंगी बाळगावी.

(झ) सार्वजनिक मालमत्तेचे जतन करावे. हिंसेचा त्याग करावा.

(ञ) देशाची उत्तरोत्तर प्रगती होण्यासाठी व्यक्तिगत व सामूहिक कार्यात उच्चत्वाची पातळी गाठण्याचा प्रयत्न करावा.

(ट) ६ ते १४ वयोगटातील आपल्या पाल्यांना पालकांनी शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून द्याव्यात.

• ‘पुस्तक’ हा शब्द खालील वाक्यांमध्ये विविध रूपांत आलेला आहे. ते वाचा व समजून घ्या.




• पुस्तकाप्रमाणे ‘वारा’ या शब्दाची खालील वाक्यांत योग्य रूपे लिहा.

(१) वारा जोरात वाहतो.
(२) ........... माती उडाली.
(३) ........... धूळ घरात आली.
(४) ........... कोण अडवणार!
(५) ........... वेग खूप होता.
(६) तू ........... जाऊ नको.

• खाली खेळांच्या साहित्याची चित्रे दिलेली आहेत. त्यांचे निरीक्षण करा. त्यांबाबत थोडक्यात माहिती लिहा.





मंजुरी क्र. : जा.क्र. मराशैसंप्रप/अविवि/शिप्र/२०१५-१६/१६७३ दिनांक- ०६/०४/२०१६



# मराठी
# सुगमभारती
## इयत्ता सहावी

(उर्दू, कन्नड, गुजराती, तेलुगू, सिंधी इत्यादी माध्यमांच्या शाळांसाठी.)

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

CBUCSS

आपल्या स्मार्टफोनवरील DIKSHA APP द्वारे पाठ्यपुस्तकाच्या पहिल्या पृष्ठावरील Q. R. Code द्वारे डिजिटल पाठ्यपुस्तक व प्रत्येक पाठामध्ये असलेल्या Q. R. Code द्वारे त्या पाठासंबंधित अध्ययन अध्यापनासाठी उपयुक्त दृकश्राव्य साहित्य उपलब्ध होईल.

प्रथमावृत्ती : २०१६
पाचवे पुनर्मुद्रण : २०२१

**मराठी भाषा तज्ज्ञ समिती :**

श्री. नामदेव चं. कांबळे (अध्यक्ष)
फादर फ्रान्सिस दिब्रिटो (सदस्य)
डॉ. स्नेहा जोशी (सदस्य)
डॉ. रोहिणी गायकवाड (सदस्य)
डॉ. माधुरी जोशी (सदस्य)
श्री. अमर हबीब (सदस्य)
श्रीमती अर्चना नरसापूर (सदस्य)
श्रीमती सविता अनिल वायळ
(सदस्य सचिव)

**संयोजन :**
श्रीमती सविता अनिल वायळ
विशेषाधिकारी, मराठी
श्रीमती उषादेवी प्रताप देशमुख
विषय सहायक, मराठी

**चित्रकार :** स्मिता क्षीरसागर
**मुखपृष्ठ :** स्मिता क्षीरसागर
**अक्षरजुळणी :**
भाषा विभाग, पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे.
**निर्मिती :**
सच्चिदानंद आफळे,
मुख्य निर्मिती अधिकारी
संदीप आजगांवकर,
निर्मिती अधिकारी
**कागद :** ७० जी. एस.एम. क्रिमव्होव
**मुद्रणादेश :** N/PB/2021-22/Qty.
**मुद्रक :**

**प्रकाशक**
विवेक उत्तम गोसावी
नियंत्रक
पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ,
प्रभादेवी, मुंबई - २५.

**© महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे - ४११ ००४.**
या पुस्तकाचे सर्व हक्क महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाकडे राहतील. या पुस्तकातील कोणताही भाग संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ यांच्या लेखी परवानगीशिवाय उद्धृत करता येणार नाही.

**मराठी भाषा अभ्यासगट सदस्य**

| | | |
|---|---|---|
| श्री. समाधान शिकेतोड | श्री. मयुर लहाने | श्री. संदीप रोकडे |
| श्री. बापू शिरसाठ | प्रा. विजय राठोड | श्रीमती स्मिता गालफाडे |
| श्रीमती प्रांजली जोशी | डॉ. माधव बसवंते | डॉ. प्रमोद गारोडे |
| श्रीमती वैदेही तारे | श्री. देविदास तारू | श्रीमती दीपाली पळशीकर |

## *प्रस्तावना*

**महाराष्ट्र शासनाने सन** २००९ मध्ये राज्यातील इंग्रजी माध्यमांच्या शाळांसह सर्व अमराठी माध्यमांच्या शाळांमध्ये इयत्ता पहिलीपासून मराठी हा विषय अनिवार्य करण्याचा धोरणात्मक निर्णय घेतला. **'प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रम २०१२'** मध्येही याच धोरणानुसार इयत्ता पहिलीपासून उर्दू, कन्नड, गुजराती, तेलुगू, सिंधी माध्यमांच्या शाळांसाठी मराठी (संयुक्त) अभ्यासक्रम तयार करण्यात आला आहे. या अभ्यासक्रमावर आधारित इयत्ता सहावीचे मराठी सुगमभारती हे पाठ्यपुस्तक तयार करण्यात आले आहे. हे पाठ्यपुस्तक आपल्या हाती देताना आनंद वाटतो.

अध्ययन-अध्यापन प्रक्रिया बालकेंद्रित असावी, स्वयंअध्ययनावर भर दिला जावा, अध्ययन व अध्यापन प्रक्रिया आनंददायी व्हावी असा व्यापक दृष्टिकोन समोर ठेवून हे पुस्तक तयार केले आहे. प्राथमिक शिक्षणाच्या विविध टप्प्यांवर विद्यार्थ्यांनी नेमक्या कोणत्या क्षमता प्राप्त कराव्यात हे अध्ययन-अध्यापन करताना स्पष्ट व्हावे, त्यासाठी या पाठ्यपुस्तकात भाषाविषयक अपेक्षित क्षमता विधानांचा समावेश करण्यात आला आहे.

या वयोगटातील विद्यार्थ्यांच्या भावविश्वातील पाठ व कवितांचा समावेश पाठ्यपुस्तकात केलेला आहे. भाषिक कौशल्यांच्या विकासासाठी नावीन्यपूर्ण स्वाध्याय, उपक्रम व प्रकल्प दिलेले आहेत. श्रवण, भाषण-संभाषण, वाचन व लेखन ही भाषिक कौशल्ये अधिकाधिक विकसित होण्यासाठी 'खेळ खेळूया', 'सुविचार', 'वाचू आणि हसू', 'वाचा', 'घोषवाक्ये', 'ओळखा पाहू', 'शब्दकोडी' यांचा समावेश केला आहे. या शीर्षकांखाली दिलेल्या मजकुरांतून विद्यार्थ्यांची निरीक्षणक्षमता, विचारक्षमता व कृतिशीलता यांस वाव मिळणार आहे. 'आपण समजून घेऊया' या शीर्षकाखाली व्याकरण घटकांची सोप्या पद्धतीने मांडणी केली आहे. विद्यार्थ्यांनी नवीन शब्द, वाक्प्रचार व म्हणी यांचा वापर सहजतेने करावा, तसेच त्यांच्यामध्ये व्याकरणविषयक जाण निर्माण व्हावी, म्हणून हे सर्व मनोरंजक व सोप्या पद्धतीने दिले आहे. विद्यार्थ्यांना स्वतःची कल्पकता वापरून लेखन करता यावे, विचार व्यक्त करता यावे, यांसाठी वैविध्यपूर्ण प्रश्न व कृती पाठ्यपुस्तकात समाविष्ट केल्या आहेत. पाठ्यघटक कसे हाताळावे, याबाबत शिक्षकांना मार्गदर्शनपर सूचना अनेक ठिकाणी दिल्या आहेत.

मराठी भाषा तज्ज्ञ समिती, अभ्यासगट सदस्य आणि चित्रकार यांच्या आस्थापूर्वक परिश्रमांतून हे पुस्तक तयार झाले आहे. पाठ्यपुस्तक जास्तीत जास्त निर्दोष व दर्जेदार व्हावे, या दृष्टीने महाराष्ट्राच्या सर्व भागांतील निवडक शिक्षक, तसेच काही शिक्षणतज्ज्ञ व विषयतज्ज्ञ यांच्याकडून या पाठ्यपुस्तकाचे समीक्षण करण्यात आले. आलेल्या सूचना व अभिप्राय यांचा काळजीपूर्वक विचार करून या पुस्तकाला अंतिम स्वरूप देण्यात आले.

मराठी भाषा तज्ज्ञ समिती, अभ्यासगट सदस्य, निमंत्रित तज्ज्ञ, संबंधित समीक्षक व चित्रकार या सर्वांचे मंडळ मनःपूर्वक आभारी आहे. विद्यार्थी, शिक्षक व पालक या पुस्तकाचे स्वागत करतील, अशी आशा आहे.

**(डॉ. सुनिल मगर)**
**संचालक**
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व
अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

**पुणे**
**दिनांक:** ९ मे, २०१६, अक्षय तृतीया
भारतीय सौर : १९ वैशाख १९३८

# भारताचे संविधान

**उद्देशिका**

**आम्ही, भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य** घडविण्याचा
व त्याच्या सर्व नागरिकांस:
सामाजिक, आर्थिक व राजनैतिक **न्याय;**
विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा
व उपासना यांचे **स्वातंत्र्य;**
दर्जाची व संधीची **समानता;**
निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा
आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा
व राष्ट्राची एकता आणि एकात्मता
यांचे आश्वासन देणारी **बंधुता**
प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून;
**आमच्या संविधानसभेत**
आज दिनांक सव्वीस नोव्हेंबर, १९४९ रोजी
**याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित करून स्वत:प्रत अर्पण करीत आहोत.**

## राष्ट्रगीत

जनगणमन–अधिनायक जय हे
भारत–भाग्यविधाता ।
पंजाब, सिंधु, गुजरात, मराठा,
द्राविड, उत्कल, बंग,
विंध्य, हिमाचल, यमुना, गंगा,
उच्छल जलधितरंग,
तव शुभ नामे जागे, तव शुभ आशिस मागे,
गाहे तव जयगाथा,
जनगण मंगलदायक जय हे,
भारत–भाग्यविधाता ।
जय हे, जय हे, जय हे,
जय जय जय, जय हे ॥

## प्रतिज्ञा

भारत माझा देश आहे. सारे भारतीय माझे बांधव आहेत.

माझ्या देशावर माझे प्रेम आहे. माझ्या देशातल्या समृद्ध आणि विविधतेने नटलेल्या परंपरांचा मला अभिमान आहे. त्या परंपरांचा पाईक होण्याची पात्रता माझ्या अंगी यावी म्हणून मी सदैव प्रयत्न करीन.

मी माझ्या पालकांचा, गुरुजनांचा आणि वडीलधाऱ्या माणसांचा मान ठेवीन आणि प्रत्येकाशी सौजन्याने वागेन.

माझा देश आणि माझे देशबांधव यांच्याशी निष्ठा राखण्याची मी प्रतिज्ञा करीत आहे. त्यांचे कल्याण आणि त्यांची समृद्धी ह्यांतच माझे सौख्य सामावले आहे.

# भाषाविषयक अध्ययन निष्पत्ती : संयुक्त भाषा मराठी सहावी

| अध्ययन-अध्यापनाची प्रक्रिया | अध्ययन निष्पत्ती |
|---|---|
| सर्व विद्यार्थ्यांना (वेगळ्या रूपात सक्षम मुलांसहित) व्यक्तिगत किंवा सामूहिक स्वरूपात प्रोत्साहन दिले जावे कारण त्यांना –<br>➤ आपल्या भाषेत बोलण्याची तसेच चर्चा करण्याची संधी दिली जावी.<br>➤ वापरल्या जाणाऱ्या भाषेच्या बारकाव्यांवर चर्चा करण्याची संधी दिली जावी.<br>➤ सक्रिय आणि जागरूक असण्यासाठी तयार केले जाणारे साहित्य (उदा., वर्तमानपत्र, पत्रिका, चित्रपट आणि दृक्‌श्राव्य साहित्य इत्यादी.) पाहण्याची, ऐकण्याची, वाचण्याची, लिहिण्याची आणि चर्चा करण्याची संधी दिली जावी.<br>➤ गटात कार्य करताना आणि एकमेकांच्या कामांबाबत चर्चा करणे, मत देणे-घेणे, प्रश्न विचारण्याचे स्वातंत्र्य दिले जावे.<br>➤ मराठीबरोबरच आपल्या भाषेतील साहित्य वाचण्याची तसेच लिहिण्याची सुविधा आणि त्यावर चर्चा करण्याचे स्वातंत्र्य दिले जावे.<br>➤ आपल्या परिवाराशी आणि समाजाशी संबंधित विविध साहित्यांचे वाचन आणि त्यावर चर्चा करण्याची संधी दिली जावी.<br>➤ आपली भाषा वाचत असताना लिहिण्यासंदर्भात क्रियाही आयोजित कराव्यात. उदा., शब्दखेळ, शब्दकोडी.<br>➤ मराठी भाषेमधील संदर्भाला अनुसरून भाषेचे विश्लेषण (व्याकरण, वाक्यरचना, विरामचिन्हे इत्यादी.) करण्याची संधी दिली जावी.<br>➤ कल्पनाशक्ती आणि सृजनशीलतेचा विकास करण्याच्या क्रिया उदा., अभिनय, मूक अभिनय, कविता, पाठ, सृजनात्मक लेख, विविध स्थितींमधील संवाद इत्यादींचे आयोजन केले जावे आणि त्याच्या तयारीशी संबंधित लिखित साहित्य आणि अहवाल लेखनाची संधी दिली जावी.<br>➤ साहित्य आणि साहित्यिक तत्त्वांची समज वाढण्याची संधी दिली जावी.<br>➤ शब्दकोशाचा वापर करण्यासाठी प्रोत्साहन दिले जावे.<br>➤ भाषा समृद्‌धीसाठी बालसाहित्याबरोबरच इतर साहित्याचा संग्रह करणे व त्याचे सादरीकरण करण्याची संधी उपलब्ध करून दिली जावी.<br>➤ परिपाठ व इतर कार्यक्रमांतून सुविचार, कथा, विविध विषय मांडण्याची संधी उपलब्ध करून दिली जावी.<br>➤ परिसरातील विविध ठिकाणे, भेटणाऱ्या व्यक्ती यांबाबत विचार मांडण्याची संधी दिली जावी. | 06.LA.01 पाहिलेल्या व ऐकलेल्या घटना (उदा., स्थानिक सामाजिक घटना, कार्यक्रम) यांविषयी न अडखळता बोलतात, प्रश्न विचारतात, मत मांडतात.<br>06.LA.02 पाहिलेल्या, ऐकलेल्या गोष्टी/घटना/मुद्दे स्वत:च्या भाषेत कथन करतात, लिहितात.<br>06.LA.03 रेडिओ, दूरदर्शन, वर्तमानपत्रे, इंटरनेट यांद्वारे पाहिलेल्या, ऐकलेल्या घटना स्वत:च्या शब्दांत मांडतात. तसेच यांचा वापर करून अधिकची माहिती मिळवतात.<br>06.LA.04 इतरांनी सांगितलेले व अनुभवलेले अनुभव आवश्यकतेनुसार लिहितात, सांगतात. उदा., बसस्थानक, रेल्वेस्थानक इत्यादी.<br>06.LA.05 विविध विषयांसाठी, विविध उद्‌देशांसाठी विरामचिन्हांचा योग्य वापर करून लेखन करतात.<br>06.LA.06 वेगवेगळ्या प्रसंगी वेगवेगळ्या उद्‌देशांनुसार लिहिताना शब्द, वाक्य, वाक्प्रचार, म्हणी यांचा योग्य वापर करतात.<br>06.LA.07 पाठ्यविषय (पाठ, कविता, विनोद, गाणी इत्यादी.) लक्षपूर्वक ऐकून त्यांचा आनंद घेतात. त्यांच्या ध्वनिफिती समजपूर्वक ऐकतात.<br>06.LA.08 कविता, गाणी अभिनयासह व योग्य आरोह-अवरोहासह आनंददायी पद्‌धतीने म्हणतात.<br>06.LA.09 वर्तमानपत्रे, मासिके व पुस्तके यांतील बालसाहित्याचे समजपूर्वक वाचन करून आस्वाद घेतात, संग्रह करतात.<br>06.LA.10 सार्वजनिक ठिकाणच्या सूचना समजपूर्वक वाचतात.<br>06.LA.11 घरी व परिसरात घडणारे अनौपचारिक संभाषण समजपूर्वक ऐकतात.<br>06.LA.12 मोठ्या माणसांच्या संवादात, मित्रांच्या गटचर्चेत सहभागी होऊन आपले मत सुस्पष्टपणे मांडतात.<br>06.LA.13 दिलेल्या शब्दांचा, शब्दसमूहांचा, म्हणी व वाक्प्रचारांचा जीवनव्यवहारात उपयोग करतात, त्यांचा संग्रह करतात.<br>06.LA.14 योग्य गतीसह समजपूर्वक प्रकट वाचन व मूकवाचन करतात.<br>06.LA.15 विनोद वाचून त्याचा आनंद घेतात.<br>06.LA.16 लेखन करताना दोन शब्दांत योग्य अंतर ठेवतात.<br>06.LA.17 परिच्छेदाचे अचूक अनुलेखन व श्रुतलेखन करतात.<br>06.LA.18 चित्रवर्णन स्वत:च्या शब्दांत लिहितात.<br>06.LA.19 सुविचार, संदेश, कथा परिपाठात सादर करतात.<br>06.LA.20 व्याकरण घटकांची माहिती घेतात व त्यांचा योग्य वापर करतात. उदा. नाम, सर्वनाम, विशेषण, क्रियापद, लिंग, वचन, शुद्‌धलेखनाचे नियम.<br>06.LA.21 शब्दकोश अकारविल्हयानुसार पाहतात. |

# अनुक्रमणिका


| अ. क्र. | पाठाचे नाव | लेखक/कवी | पृ. क्र. |
|---|---|---|---|
| १. | नव्या युगाचे गाणे (गाणे) | शुभदा दादरकर | १ |
| २. | अन् दयाळ वाचला | डॉ. सतीश पांडे | २ |
| ३. | कळो निसर्ग मानवा (कविता) | सचिन बेंडभर | ५ |
| ४. | दोन भाऊ (चित्रकथा) | घनश्याम देशमुख | ९ |
| ५. | मला वाटते (कविता) | मधुकर बारस्कर | १२ |
| ६. | भांडण चवींचे | हेमलता परदेशी | १४ |
| ७. | चंद्रावर मी गेलो तेव्हा... (कविता) | राजन साटम | १८ |
| ८. | अपार प्रेम | शुभदा सुरंगे | २१ |
| ९. | चला पुढे! चला पुढे! | डॉ. इंदुमती अरकडी | २४ |
| १०. | छोटीशी बी (कविता) | माया धुप्पड | २९ |
| ११. | वाईटातून चांगले | सुभाषचंद्र वैष्णव | ३२ |
| १२. | शाळा नको आताच सुटायला (कविता) | ज्योती कदम | ३५ |

# १. नव्या युगाचे गाणे

● ऐका. म्हणा. वाचा.

नव्या युगाचे नवीन गाणे,
एक दिलाने गाऊ
मानवतेचा दीप अंतरी नित तेवत ठेवू ।।धृ।।

अज्ञानाचा तिमिर सारुनी
तेजोमय हा सूर्य उगवला
विज्ञानाच्या नभोमंडळी आपण तारे होऊ ।।१।।

रंग आपुला वेगवेगळा
सूर आपुला एकसारखा
अनेकतेतून एकत्वाचे गाणे आपण गाऊ ।।२।।





हातामध्ये हात गुंफुनी
देशहिताचे मंत्र जपोनी
हासत-खेळत ध्येयमंदिरी पुढे पुढे जाऊ ।।३।।

भारतभूची पवित्र माती
प्रिय आम्हाला स्वर्गाहुनही
या धरणीचे रक्षण करण्या प्राण पणाला लावू ।।४।।

– शुभदा दादरकर

● वाचा.

माझ्या मराठीची गोडी
मला वाटते अवीट
माझ्या मराठीचा छंद
मना नित्य मोहवीत !

–वि. म. कुलकर्णी

लाभले अम्हास भाग्य बोलतो मराठी
जाहलो खरेच धन्य ऐकतो मराठी
धर्म, पंथ, जात एक जाणतो मराठी
एवढ्या जगांत माय मानतो मराठी

– सुरेश भट

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांकडून गटात तसेच वैयक्तिकरीत्या गाणे तालासुरात साभिनय म्हणून घ्यावे. विद्यार्थ्यांना गाणे, कविता, समूहगीते यांच्या ध्वनिफिती ऐकवाव्या.